स्थापना : दि. ५ मे २००८
नों.क्र.महा./२४१२१/को./११/०७/०८

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
विद्वत्प्रमाणित, यु.जी.सी. मान्यताप्राप्त त्रैमासिक
(Peer Reviewed Referred Research Journal )
ISSN No. 2319-6025

# शिविम संशोधन पत्रिका

वर्ष-आठवे : अंक सतरा-अठरा । जानेवारी ते जून २०१९

## श्रमसंस्कृती आणि साहित्य

दिनांक ९ आणि १० फेब्रुवारी, २०१९



कुणी न राहो दुर्बल अज्ञ । म्हणुनी हा शिक्षण यज्ञ ।।

माजी आमदार श्री. बाबासाहेब पाटील सरुडकर शिक्षण संस्थेचे

## श्री शिव-शाहू महाविद्यालय, सरूड

ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

नॅक तृतीय मूल्यांकन : B ग्रेड (CGPA- 2.41)

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal )

ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली, मान्यता अ. क्र. ६४१७५)

**वर्ष–आठवे : अंक सतरा–अठरा**

जानेवारी–फेब्रुवारी–मार्च, एप्रिल–मे–जून २०१९

## श्रमसंस्कृती आणि साहित्य

संपादक

**डॉ. शिवकुमार सोनाळकर**

कार्यकारी संपादक

**डॉ. नीला जोशी**

संपादक मंडळ

**डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. तातोबा बदामे, डॉ. दिनेश वाघुंबरे**

संपादन सहाय्य

**प्रा. प्रकाश नाईक, प्रा. रघुनाथ मुडळे**

सल्लागार समिती

**डॉ. राजन गवस, डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. डी. ए. देसाई, डॉ. अनिल गवळी**

**प्रकाशक**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ४१६ ०११

**मुद्रक**

भारती मुद्रणालय

८३२ ई वॉर्ड, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर. फोन : (०२३१) २६५४३२९

मूल्य : रु. ३००/-

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| अध्यक्षीय मनोगत... | डॉ. शिवाजी विष्णू पाटील | ८ |
| श्रमसंस्कृती, साहित्य आणि बांधिलकी | डॉ. अनिल गवळी | १३ |
| ग्रामीण कष्टकरी स्त्रीचे चित्रण | एकनाथ पाटील | १८ |
| श्रमसंस्कृती आणि गोमंतकीय मराठी साहित्य | डॉ. विद्या प्रभुदेसाई | २७ |
| श्रमसंस्कृती आणि कोकणी साहित्य | डॉ. महेश स. बावधनकर | ३३ |
| सीमाभागातील श्रमसंस्कृती आणि साहित्य | डॉ.शिवाजीराव पाटील | ४२ |
| श्रमसंस्कृती आणि ग्रामीण साहित्य | डॉ. यशवंत चव्हाण | ४८ |
| श्रमसंस्कृती आणि भटक्याविमुक्तांचे साहित्य | डॉ. बाळासाहेब संतू चव्हाण | ५३ |
| श्रमसंस्कृती आणि स्त्रीवादी साहित्य | डॉ. लता पांडुरंग मोरे | ६६ |
| श्रमसंस्कृती आणि दलित साहित्य | डॉ. चंद्रकांत शंकर कांबळे | ७० |
| श्रमसंस्कृती आणि आदिवासी साहित्य | प्रा. डॉ. दीपककुमार वळवी | ७७ |
| श्रमसंस्कृती आणि ग्रामीण कष्टकरी स्त्री | डॉ.मानसी जगदाळे | ८१ |
| श्रमसंस्कृती आणि महानगरीय कविता | तेजस चव्हाण | ८७ |
| मधउत्पादक श्रमजीवी | श्री. दत्ता मोरसे | ९३ |
| भारतीय श्रमसंस्कृती आणि मराठी श्रमगीत परंपरा | प्रा. अनंता कस्तुरे | ९७ |
| नोकरी, व्यवसाय, करिअर करणारी स्त्री | प्रा. डॉ. शिवकुमार सोनाळकर | १०७ |
| महादेव मोरे : श्रमिक साहित्याचा आधारस्तंभ | प्रा. डॉ. रमेश पोळ | ११२ |
| खोत व दौंड यांच्या कादंबरीतील शेतकरी | डॉ. एकनाथ आळवेकर | ११६ |
| महादेव मोरेंच्या साहित्यातील विडी कामगार | प्रा. डॉ. संजय दशरथ पाटील | १२० |
| मराठी स्त्रीगीते आणि श्रमसंस्कृती | डॉ. नीला जोशी | १२३ |
| 'कुळंबीण' : शेतकरी स्त्रीच्या श्रमाचे चित्रण | डॉ. आनंद वारके | १२७ |
| जागतिकीकरण आणि मराठी कादंबरीतील श्रमिक | डॉ. प्रकाश दुकळे | १३० |
| महात्मा बसवण्णांचा श्रमसिद्धांत : 'कायकवे कैलासा' | डॉ. मांतेश हिरेमठ | १३३ |
| मराठी नाटकातील श्रमजीवींचे चित्रण | प्रा. डॉ. दत्ता पाटील | १३७ |
| म. फुले यांच्या साहित्यामधील श्रमिकांचे चित्रण | डॉ. अरुण शिंदे | १४३ |
| नारायण सुर्वे यांच्या कवितेतील कामगारविषयक जाणिवा | डॉ. शिवलिंग मेनकुदळे | १४६ |
| नारायण सुर्वेंच्या कवितेतील कामगार | प्रा. डॉ. शिवाजी महादेव होडगे | १५१ |

# कृष्णात खोत आणि कैलास दौंड यांच्या कादंबरीतील शेतकरी

**डॉ. एकनाथ आळवेकर**

मराठी विभाग प्रमुख, दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँण्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी

**प्रास्ताविक**

१९९० नंतरच्या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरी लेखकात कृष्णात खोत आ… कैलास दौंड यांचा महत्त्वपूर्ण उल्लेख करावा लागेल. त्यांच्या कादंबऱ्यांतून वंचित म्हणू… आलेला घटक म्हणजे शेतकरी होय. कृष्णात खोत हे पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या… समाजजीवनाच्या समस्या मांडणारे लेखक आहेत तर कैलास दौंड हे मराठवाडा परिसराती… शेतीप्रश्न आणि समाज- संस्कृतीबद्दल मांडणी करतात. म्हणूनच १९९० नंतरच्या कालखंडाती… कादंबऱ्यांतील शेतकऱ्यांचे चित्रण यांविषयी मांडणी करताना कृष्णात खोत यांच्या 'झड-झिंबड', 'धुळमाती' आणि 'रिंगाण' तसेच कैलास दौंड यांच्या 'कापूसकाळ' या कादंबऱ्यां… प्रस्तुत लेखात विचार केला आहे.

कृष्णात खोत यांनी 'गावठाण', 'रौंदाळा', 'झड-झिंबड', 'धूळमाती', 'रिंगाण' या… कादंबऱ्यातून कोल्हापूर परिसरातील शेती, समाज, निसर्ग, राजकारण, संस्कृती यावर भा… केले आहे. 'झड-झिंबड' या कादंबरीमध्ये पाऊस आणि शेतकरी यांच्यामधील संघर्ष दाखव… आहे. माणसाला जीवदान देणारा पाऊस माणसाच्या जीवावर उठतो. पाऊस आणि माणसाती… ताणतणाव लेखकाने कादंबरीतून चित्रीत केला आहे. अतिवृष्टिमुळे होणारे नुकसान कोल्हा… परिसरातील शेतकऱ्याला नवीन नाही म्हणून कादंबरीतील भिका म्हणतो, 'यका घटं… पडायला लागला तर पिरतीमीला बुडवील' ('झड-झिंबड' पृ.७). 'झड-झिंबड' मध्ये पावसा… रणकंदन पाहायला मिळते. पावसाने प्रचंड नुकसान झाले आहे. नाना पांगेच्या केळी जमीनदो… झाल्या. येसबा पाटलांची कलमी आंब्याची झाडं मोडून पडलीत. ओढ्यातील प्रचंड पाण्यानं… शेतजमीन वाहून गेली. बैलासह शेतकरी वाहून गेला. पांडू शिंदे शेतातल्या घराभोवतीनं पाण्या… वेढल्यानं अडकून पडतो. अनेकांची घरं पडून नुकसान होतं. गुराढोरांना वैरण मिळत नाही… वाळवकराच्या शेरडास्नी बुळकांडी लागते आणि ती मरतात. गावातल्या किराण दुकानातल… वस्तू संपल्या. आजारी पडलेल्या माणसांना द्यायला डॉक्टरकडली औषधं संपलीत. गावा… पुराच्या पाण्याने वेढल्याने गाव एकाकी पडले.

पावसानं शेतकऱ्यांचं, त्यांच्या शेतीभातीचं, घराचं नुकसान झालं आहे. पाऊस कै… झाल्याची भावना छोट्याशा गावातील माणसं व्यक्त करतात. अशा परिस्थितीत खेड्याती… मानवता उपयोगी पडते. वंचित म्हणून संकटे झेलणाऱ्या शेतकऱ्याला त्याचा शेजारी… पाजारीच उपयोगी पडतो. शासकीय पातळीवरील मदतीपासून तो शेतकरी कोसो दूर अस… जनावरांची वैरण वाटून घेतात. घरातलं पीठ, तांदूळ एकमेकांना वाटून खातात. पाऊस, पू… ओसरल्यावर नुकसानीचे पंचनामे होतात पण त्यातही भ्रष्टाचार आड येतो. वंचितांचे दु…



ISSN No. 2319-60…

मुसह्य होण्यापेक्षा असह्य होते. वंचित म्हणून वेदना सहन करणाऱ्या शेतकऱ्यांविषयीचे कृष्णात खोत यांनी 'झड-झिंबड' मधून चित्रण केले आहे.

'धूळमाती' या कादंबरीमध्ये जमीनदार आणि शेती कसणारा घटक म्हणून कूळ या दोघांतल्या तणावाचे चित्रण येते. ग्रामीण भागात प्रत्यक्ष शेतात राबणारा पण भूमिहीन म्हणून असणारा वर्ग आहे. गावातला जमीनदार आपली शेती अनेक कुळांना शेती कसण्यास देतो. जशा जमीन मालकाच्या पिढ्या असतात तशा कुळांच्यादेखील पिढ्या असतात. पिढ्यान्‌पिढ्या वंचित राहिलेला, कष्ट करणारा घटक म्हणून कुळाकडे पाहाता येईल.

कादंबरीतील दादाकडे गावातल्या दाजीचा नारगुंडीचा माळ अनेक वर्षे कसायला असतो. मुलाच्या नोकरीसाठी पैसे भरायचे असल्याने दाजीने नारगुंडीचा माळ विकायला काढलेला असतो. दाजीच्या आईनं दाजीला सांगितलं होतं, 'त्यास्नी लय श्यात न्हाई तवा कुठंबी चार काकऱ्या दे' (धूळमाती, पृ.२४). आईच्या शब्दाला जागून दाजीनं तो माळ विकत घ्यायचा आग्रह केला. पण दादाची फसवणूक करून दाजी गावातल्या बऱ्याबापूला रान विकतो. दादाची फसवणूक करतो. या घटनेमुळे दादाच्या सर्व कुटुंबाची अवहेलना होते.

दादांच्या सगळ्या कुटुंबानं दाजीच्या रानात कष्ट केलं होतं. बारा महिने राबून कुळाला खळ्यावरचा निम्मा भागच घराकडं न्यावा लागतो. त्याग आणि कष्टातून कुळाला केवळ कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी कुळपद्धतीने राबावे लागते. दादाच्या कुटुंबानं नारगुंडीच्या माळावर मेहनत करून सोनं पिकवलं होतं. त्या कुटुंबाच्या कष्टाची जाण न राखता केवळ पैशाच्या हव्यासापोटी दाजी रान दुसऱ्याला विकतो. जमीनदार आणि कुळाचे पूर्वीच्या काळातले जिव्हाळ्याचे ऋणानुबंध आणि आताच्या काळातील केवळ मालक आणि श्रमिक म्हणून उरलेले संबंध यावरही कृष्णात खोत यांनी 'धूळमाती' च्या निमित्ताने प्रकाश टाकला आहे. दाजीने दादावर केलेला अन्याय गावातील माणसांना पसंत नसतो. दाजीनं हातोहात फसवल्याने दाजीबद्दलच्या रागानं दादाचं कुटुंब पेटते. दादाचा थोरला मुलगा आण्णाच्या तळपायाची आग मस्तकात जाते. दादाच्या पत्नीला हे सहन करण्यापलीकडचे असते. धाकटा मुलगा राजबाने बँकेतून कर्ज काढून, पै-पाहुण्यांकडून हातउसने पैसे आणलेले असतात. कादंबरीत जमीन मालकाचा विजय होतो तर कूळ म्हणून दादा मात्र प्रामाणिक कष्ट करूनही वंचित राहतो.

कृष्णात खोत यांनी 'रिंगाण' या कादंबरीतून धरणग्रस्त शेतकऱ्याची शोकांतिका मांडली आहे. ही कादंबरी 'तुटलेल्या मुळांच्या कोंबाना' अर्पण केली आहे. 'रिंगाण' या कादंबरीतला नायक देवाप्पा हा धरणग्रस्त आहे. विस्थापित देवाप्पाचे कुटुंब मूळ ठिकाणापासून लांबच्या प्रदेशात जाते. सरकारनं धरणग्रस्तांना वेगवेगळ्या ठिकाणी वस्तीला जागा आणि शेत दिले. देवाप्पाच्या कुटुंबालाही एका गावात वस्तीला जागा आणि शेत सरकारकडून मिळते. उचले म्हणून आलेल्या देवाप्पाच्या कुटुंबाला त्या परक्या गावात वेगवेगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागते. नव्या गावात राहताना ती माणस त्यांना रुजू देत नव्हती. देवाप्पाला सरकारकडून मिळालेल्या शेतातील हरभरा चोरीस जातो. उलट त्यांच्यावरच चोरीचा आळ घेतला जातो. देवाप्पाच्या आईला ही कापडातली माणसं कुणाचीच नसतात असे वाटते. मूळ शेतकरी असलेल्या या देवाप्पाच्या कुटुंबाला प्रस्थापित - विस्थापित संघर्षाला तोंड द्यावे लागते.

ISSN No. 2319-6025

डोंगरकपारीत राहणारा देवाप्पा हा छोटा शेतकरी, धरणग्रस्त म्हणून विस्थापित हो... परक्या ठिकाणी जाताना सगळी जनावर बरोबर नेऊ शकत नव्हता. त्यातल्या दुभ... नसलेल्या म्हशी तिथंच जंगलात सोडून दिल्या होत्या. सोडून आलेली ढोरं दुभती झाल्या... हे समजल्यावर देवाप्पा आपल्या मुदीवाल्या म्हशीला दावं लावून आणण्यासाठी मूळवस्तीक... जंगलात जातो. म्हसरांना, रेडकांना नेऊन विकून पैसे करायचे असे देवाप्पासह सर्वां... वाटते. अल्पभूधारक पण विस्थापित झालेल्या या शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती याव... ध्यानात येते. दूधदुभत्यांच्या जोडधंद्यावर जगणारा हा श्रमिकवर्ग आहे.

पण एका अपेक्षेने गेलेल्या देवाप्पाला तिथल्या म्हशी हुलकावणी देतात. त्याच्या... ओळखही दाखवत नाहीत. देवाप्पाच्या म्हसरांनी सगळ्या जंगलभर हिंडवत देवाप्पा... दावणीला बांधून फिरवलं. देवाप्पाला हद्दीपर्यंत पाठलाग करून हद्दीपार करून पळवू... लावतात. कादंबरीतील देवाप्पाचा शेवटी पराभव होतो. देवाप्पाची तुटकी मूळ रुजविण्याची... धडपड व्यर्थ होते, याचे चित्रण येते.

यानंतर कैलास दौंड या महत्त्वपूर्ण कादंबरीकाराचा विचार केला आहे. कैलास दौंड हे मराठवाडा-विदर्भातील शेती, शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन पुढे आलेले लेखक आहेत. त्यांनी 'कापूसकाळ' ही कापूसउत्पादक शेतकऱ्यांवर आधारित कादंबरी लिहिली. या कादंबरीमध्ये कापसाचे उत्पन्न, कापूस वेचायचा प्रश्न, कापसाला मिळणारा भाव, कापूस उत्पादक शेतकऱ्यांची होणारी अडवणूक, फसवणूक इत्यादी गोष्टींकडे लक्ष वेधले आहे. विदर्भ-मराठवाड्यातल्या शेतकऱ्याला अवर्षणाचा सामना करावा लागतोच. त्याचबरोबर शेतीतून मिळणाऱ्या उत्पादनाच्या बाजारभावासाठी झट्याझोंब्या खाव्या लागतात. इथला शेतकरी सुद्धा निसर्ग आणि शासनाकडून वंचित राहिला आहे.

'कापूसकाळ' मधील जगू हा कापूस उत्पादन करणारा मध्यमवर्गीय शेतकरी शेतात पिकलेला कापूस फेडरेशनला विकतो. पण त्याला वेळेवर पैसे मिळत नाहीत. स्वतः जगू बायकोला घेऊन कापूस वेचतो. भाड्याच्या ट्रॅक्टरमधून कापूस नेऊन महिनाभर फेडरेशनच्या दारात थांबावे लागते. व्यापाऱ्यांचा कापूस मात्र भ्रष्ट मार्गाने वजनकाट्यावर जातो. हे शेतकऱ्यांना सहन होत नाही. इथे शेतकऱ्याला मिळणाऱ्या दुजाभावाचे वर्णन येते. परिस्थितीमुळे शेतकऱ्याला नुकसान सोसावे लागते. गाडीभाडं देण्यासाठी रखमाला स्वतःचा कापूस कमी किमतीत विकावा लागतो. बैलगाडीतून कापूस विकायला गेलेल्या मोहनचा बैल चारा-पाण्यावाचून पाय सडून मरून जातो. फेडरेशनमध्ये अचानक कापूस पेटतो आणि मग कापूस खरेदी बंद होते. दुसऱ्या फेडरेशनला कापूस विकत घेण्यासाठी शेतकऱ्याला बाजार समितीच्या लोकांच्या पाया पडावे लागते. कादंबरीतील सुशाबाई लहान लेकराला सोबत घेऊन कापूस वेचणीला जाते. ताप आलेल्या पोराला डॉक्टरकडे नेण्यासाठी बाजारात थोडा कापूस विकते. अंगावरचं पाताळ फाटलेलं असतं. पै-पाहुण्यांच्या लग्नकार्याला जावे लागणार असते. म्हणून कापूस विकून पैसा लवकर मिळावा, असे तिला वाटते. सुशाबाईच्या चित्रणातून शेतकरी स्त्रीची वेदनाही लेखकाने कादंबरीतून मांडली आहे. थोडक्यात, कैलास दौंड यांनी कापूस उत्पादक शेतकऱ्यांची व्यथा अत्यंत परिणामकारकरीतीने मांडली आहे.



ISSN No. 2319-6025

**समारोप**

कृष्णात खोत यांच्या 'झड-झिंबड', 'धूळमाती' आणि 'रिंगाण' तसेच कैलास दौंड यांच्या 'कापूसकाळ' या कादंबऱ्यांमधून जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी वंचितांचे दुःख घेऊन जगत असतो याचे चित्रण येते. श्रम करून पोट भरणे एवढीच त्यांची आयुष्यभर धडपड असते. निसर्ग आणि मानवाकडून येणाऱ्या संकटाचा तो सामना करीत असतो. या वंचितांना करावा लागणारा संघर्ष या लेखकद्वयांनी अत्यंत गंभीरपणे रेखाटला आहे.

**संदर्भ**

१. खोत कृष्णात, 'झड-झिंबड', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई २०१३
२. खोत कृष्णात, 'धूळमाती', मौज प्रकाशन, मुंबई २०१४
३. खोत कृष्णात, 'रिंगाण', शब्द पब्लिकेशन, मुंबई २०१८
४. दौंड कैलास, 'कापूसकाळ', मीरा बुक्स अँण्ड पब्लिकेशन, औरंगाबाद २००९

◆

ISSN No. 2319-6025